अधिकारी घडविणारी विश्वसनीय संस्था

# स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

UPSC / MPSC / BANKING / SSC

Director : Dr. Vilas S. Gajghate 9923262977

प्रश्नप्रत्रिका क्रमांक
**BOOKLET NO.** 202302

**2023**

Code : YO2

## संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क)

सामान्य क्षमता चाचणी

वेळ : 1 (एक) तास

Paper No. 02

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनात न विसरता बॉलपेनने लिहावा.

परीक्षा - क्रमांक | | | | | | | | (केंद्राची संकेताक्षरे ... शेवटचा अंक)

(3) वर छापलेला प्रश्नप्रत्रिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईनेचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(क) मराठी व इंग्रजी आकलनावरील प्रश्न अनुक्रमे फक्त मराठी व फक्त इंग्रजी भाषेत असतील.

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणारा नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे. पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नूमद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) (अ) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत".**

(ब) "Decision Making & Problem Solving" वरील प्रश्नांच्या चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा केले जाणार नाहीत. **प्रस्तुत प्रश्न वगळून प्रश्नपत्रिकेतील उर्वरित प्रश्नांकरिता उमेदवारांनी सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील.**

### ताकीद (नमूना)

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणतयाही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिध्द करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम - ८२" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/ किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुध्दा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुध्द उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK.

# परीक्षार्थीचे स्व-आकलन

## ✦ संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क) ✦

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण प्रश्न | मी सोडवलेले प्रश्न | बरोबर | चुक | कोणत्या घटकावर चुकले | चुकलेल्या घटकासाठी अभ्यासाचे केलेले नियोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | राज्यव्यवस्था | | | | | | |
| 2. | अर्थव्यवस्था | | | | | | |
| 3. | इतिहास | | | | | | |
| 4. | भुगोल | | | | | | |
| 5. | सा. विज्ञान | | | | | | |
| 6. | गणित व बुध्दीमत्ता | | | | | | |
| 7. | चालू घडामोडी | | | | | | |

🕮 ✍ मी अशी खात्री देतो की चुकलेल्या घटकावरती अभ्यास करुन भविष्यात त्या चुका टाळेल.

**कच्च्या कामासाठी जागा / Space For Rough Work.**

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

1 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने ओळखा.**
अ) केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष जून 2022 पासून 'नितीन गुप्ता' हे काम पाहत आहेत.
ब) प्रत्यक्ष कर हा व्यक्तीवर आकारला जातो.
क) प्रत्यक्ष करामध्ये कर आघात व करभरणा हे दोन घटक महत्वाचे असतात.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ विधान योग्य आहेत. 2) वरील सर्व विधाने योग्य आहेत.
3) फक्त अ आणि क विधाने योग्य आहेत. 4) फक्त ब आणि क विधाने योग्य आहेत.

2 **"फोरेन्सिक पुरावा" कॅम्पल्सरी करणारे देशातील पहिले 'पोलीस दल' कोणत्या राज्याचे/केंद्रशासित प्रदेशाचे आहे ?**
1)महाराष्ट्र 2) दिल्ली 3) जम्मू काश्मीर 4) हरियाना

3 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने ओळखा.**
अ) भारतीय नौदलाच्या ध्वजावरून सेंट जॉर्ज क्रॉसचं चिन्ह हटवून नांगर असणारे ध्वज भारतीय नौदलाला मिळाले आहे.
ब) भारतीय नौसेना ध्वजाचे प्रारूप छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांच्या प्रेरणेतून घेतले आहे.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त विधान ब) योग्य आहे. 2) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत.
3) फक्त विधान अ) योग्य आहे. 4) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने अयोग्य आहेत.

4 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने ओळखा.**
अ) 6 ऑगस्ट 2022 रोजी भारताचे 15 वे उपराष्ट्रपती म्हणून जगदीप धनखर यांची निवड करण्यात आली आहे.
ब) 6 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या उपराष्ट्रपती पदाच्या निवडणूकीत 780 पैकी 730 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.
क) 6 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या उपराष्ट्रपती पदाच्या निवडणूकीत एकूण 35 मतपत्रिका अवैदय ठरविण्यात आल्या होत्या.
**पर्यायी उत्तरे**
1)फक्त ब) विधाने योग्य आहेत. 2)फक्त अ) आणि क) विधाने योग्य आहे
3) फक्त अ) विधान योग्य आहे. 4) वरीलपैकी एकही योग्य पर्याय नाही.

5 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने ओळखा.**
अ) 'राष्ट्रपती भवन ते इंडिया गेट' या पुर्वी राजपथ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मार्गाचे कर्तव्य पथ असे नामकरण करण्यात आले आहे.
ब) 'कर्तव्य पथ' हा सुधारीत मार्ग हा भारत सरकारच्या रस्ते विकास महामंडळाचा महत्वपूर्ण भाग आहे.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ विधान योग्य आहे. 2) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत.
3) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने अयोग्य आहेत. 4) फक्त ब विधान योग्य आहे.

6 **सन 2022 च्या 'बुकर' पुरस्कारामध्ये शेहान करूणतिलका यांच्या 'द सेव्हन मून्स ऑफ माली अल्मेडा' ही कादंबरी यंदा आशियाई राष्ट्रांमधील लेखकांचे प्रतिनिधित्व करती आहे. तर शेहान करुणतिलका हे कोणत्या देशाचे आहेत?**
1) म्यानमार 2) अफगाणिस्तान 3) श्रीलंका 4) नेपाळ

7 **भारताने ... देशाबरोबर कुशियार हा पाणी वाटप करार नुकताच केला आहे ?**
1) पाकिस्तान 2) नेपाळ 3) भूटान 4) बांग्लादेश

8 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने ओळखा.**
अ) 'इस्त्रो' या अंतराळ संशोधन संस्थेत 4 ऑगस्ट 2022 रोजी (Small satellite launch vehicle' (SSLV) या नव्या प्रक्षेपकाचे उद्घाटन केले आहे.
ब) (Small satellite launch vehicle' या प्रक्षेपकाच्या मदतीने 5000 किलो ग्रॅमपेक्षा कमी वजनाच्या उपग्रह अवकाशात प्रक्षेपित करण्यासाठी वापर केला जाणार आहे.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त ब विधान योग्य आहे. 2) फक्त अ विधान योग्य आहे.
3) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत. 4) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने अयोग्य आहेत.

9 **5 ऑगस्ट 2022 रोजी 'भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' पतधोरण समितीच्या बैठकीमध्ये 2022-23 या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची किंवा जिडीपी वाढ... टक्के राहिल असे निश्चित केले आहे.**
1)8.2% 2) 7.2% 3)6.5% 4) 5.3%

10 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने ओळखा.**
**अ) समुद्रातील संशोधनासाठी केंद्र सरकारने 'समुद्रयान' ही मोहीम नुकतीच सुरू केली आहे.**
**ब) समुद्रयान मोहीमे अंतर्गत 'MATSYA - 600' या समुद्रात खोलवर जाऊन खनिजांचा शोध घेणाऱ्या वाहनांचा वापर करण्यात येणार आहे.**
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत. 2) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने अयोग्य आहेत.
3) फक्त ब विधान योग्य आहे. 4) फक्त अ विधान योग्य आहे.

11 **मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन मध्ये किती टक्के भागीदारीचा निर्णय 8 ऑगस्ट 2022 रोजी महाराष्ट्र शासनाने घेतला आहे ?**
1) 25 टक्के 2) 50 टक्के 3)15 टक्के 4) 33 टक्के

12 **'डॉर्निअर विमान' याबाबत योग्य विधान/ने ओळखा.**
अ) भारत सरकारने म्यानमार या देशासाठी डॉर्निअर विमान हस्तातरित केले आहे.
ब) 'डॉनिअर विमान' हे भारतीय नौदलाच्या संशोधनातून तयार झाले आहे.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त ब विधान योग्य आहे. 2) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत.
3) फक्त अ विधान योग्य आहे. 4) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने अयोग्य आहेत.

13 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने ओळखा.**
अ) अरुणाचल प्रदेशामध्ये 16 ऑगस्ट 2022 रोजी ड्रोन यंत्रणेवर आधारित आरोग्य सेवा सुरू करण्यात आली आहे.
ब) ही आरोग्य सेवा पुरविण्यासाठी 'WHO' 'वर्ल्ड हेल्थ ऑरर्गनायझेशन' निधी पुरवला आहे.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त ब विधान योग्य आहे. 2) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने अयोग्य आहेत.
3) फक्त अ विधान योग्य आहे. 4) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत.

14 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने ओळखा.**
अ) "पत्नीच्या मृत्यूनंतर जर महिलेने दुसरे लग्न केले, तर तिच्या मुलांचे आडनाव ठरविण्याचा अधिकार संबंधित महिलेला नाही." असा महत्वपूर्ण निर्णय माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिला.
ब) अन्नदाता पित्याच्या मृत्यूनंतर आई मुलाची एकमेव कायदेशीर आणि नैसर्गिक पालक असते. ही बाब सर्वोच्च न्यायालयाने निकालात नमुद केली आहे.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने अयोग्य आहेत. 2) फक्त ब विधान योग्य आहे.
3) फक्त अ विधान योग्य आहे. 4) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत.

15 **सध्या चर्चेत असलेली "अम्लान बोरगोहेन" कोणत्या खेळाशी संबंधित आहे ?**
1) हॉकी 2) क्रिकेट 3) रनर 4) फुटबॉल

16 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**
(अ) सन 1975 - 76 मध्ये आणी बाणीच्या काळात स्वर्णसिंग समितीच्या शिफारशीनुसार सन 1976 च्या 42 व्या घटना दुरूस्ती कायद्यान्वये मूलभूत कर्तव्यांचा समावेश राज्यघटनेत करण्यात आला.
(ब) भारतीय राज्यघटनेच्या भाग - चार मध्ये मूलभूत कर्तव्य दिली आहेत.
(क) भारतीय राज्यघटनेच्या कलम - 51 मध्ये एकूण 12 मूलभूत कर्तव्ये समाविष्ठ केली आहेत.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त क विधान योग्य आहे. 2) फक्त अ विधान योग्य आहे.
3) अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत. 4) अ आणि क दोन्ही विधाने योग्य आहेत.

17 **भारतीय घटना समितीने कोणत्या दिवशी राष्ट्रीय ध्वज स्वीकृत केला आहे ?**
1) 29 मे 1949 2) 24 जानेवारी 1950 3) 26 जानेवारी 1950 4) 22 जुलै 1947

18 **'भारताच्या राष्ट्रपती पदाबाबत' योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) राष्ट्रपतीच्या निवडणूकीत लोकसभा, राज्यसभा आणि राज्यविधीमंडळाचे कनिष्ठ सभागृहातील लोक निर्वाचित सदस्ये भाग घेतात.

(ब) राष्ट्रपतीच्या निवडणूकीत विधानसभा सदस्यांच्या मताचे मुल्य = $\frac{\text{राज्यविधानसभेतील निवडून आलेले सदस्य}}{\text{राज्याची लोकसंख्या}} \times \frac{1000}{1}$ असे ठरविले जाते.

(क) सन 2022 च्या राष्ट्रपती पदाच्या उमेद्वार राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून द्रोपदी मुर्मू आहेत.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त विधाने अ आणि क योग्य आहेत. 2) फक्त विधाने अ आणि ब योग्य आहेत.
3) फक्त विधान ब योग्य आहे. 4) फक्त विधान क योग्य आहे.

19 **भारतीय राज्यघटनेच्या परिशिष्ठ दहा मधील तरतुदीनुसार विधानसभा सदस्यांना पक्षांतरबंदी कायद्यानुसार अपात्र ठरविण्याचा अधिकार कोणाला आहे ?**

1) राज्यपाल 2) राष्ट्रपती 3) मुख्यमंत्री 4) विधानसभेचा सभापती

20 **खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत राष्ट्रपती उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला उच्च न्यायालयाचा प्रभारी मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्त करू शकतात ?**

(अ) उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाचे पद रिक्त असेल तर-

(ब) उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश तात्पुरत्या कालावधीसाठी अनुपस्थित असेल तर,

(क) उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश त्याच्या पदाची कामे करण्यास अकार्यक्षम असेल तर -

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त अ परिस्थिती नुसार - 2) फक्त ब परिस्थिती नुसार -
3) फक्त क परिस्थिती नुसार - 4) वरील सर्व परिस्थितीत राष्ट्रपती प्रभारी न्यायाधिश म्हणून नियुक्त करू शकतात.

21 **'मेघालय' या राज्यात पंचायतराज संस्था किती स्तरीय आहे ?**

1) एकस्तरीय 2) द्विस्तरीय 3) त्रिस्तरीय 4) चतु:स्तरीय

22 **'जी. व्ही. के. राव समिती' बाबत योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) नियोजन आयोगाने या समितीची स्थापना 1992 साली केली होती.

(ब) ग्रामीण विकास आणि दारिद्रयनिर्मूलन कार्यक्रमासाठी प्रशासकीय व्यवस्थेसंबंधीची समिती म्हणून ओळखली जाते.

(क) या समितीने पंचायतराज व्यवस्थेत नोकरशाहीला महत्व दिले.

**पर्यायी उत्तरे**

1) अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत. 2) अ आणि क दोन्ही विधाने योग्य आहेत.
3) फक्त ब विधान योग्य आहे. 4) फक्त क विधान योग्य आहे.

23 **महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम - 10 (2) अनुसार राखीव जागांची संख्या विहित रितीने निर्धारित करण्याचे अधिकार ------ यांना आहेत.**

1) राज्य निर्वाचन आयोग 2) केंद्रीय निर्वाचन आयोग 3) विभागीय आयुक्त 4) जिल्हाधिकारी

24 **महानगरपालिकेच्या परिवहन समितीत एकूण किती सदस्य असतात.**

1) 7 2) 5 3) 4 4) 9

25 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांच्या कलम - 57 मधील तरतुदीनुसार प्रत्येक गावाचा एक निधी असतो.

(ब) राज्यशासनाने किंवा जिल्हा परिषदेने किंवा पंचायत समितीने ग्रामनिधीस अंशदान म्हणून दिलेल्या रकमा याचा समावेश ग्रामनिधीमध्ये होतो.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त अ विधान योग्य आहे. 2) फक्त ब विधान योग्य आहे.
3) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 4) विधाने अ आणि ब दोन्ही अयोग्य आहेत.

26 **'भांडवलशाही अर्थव्यवस्था' या बाबत अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) उत्पादनाच्या साधनांचा खाजगी आणि सार्वजनिक मालकी हक्क हे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे मूलभूत वैशिष्टे आहे.

(ब) उद्योग - व्यवसायाची निवड व त्यांची उभारणी यासंबंधीचे निर्णय मालक स्वत: स्वतंत्रपणे घेऊ शकतात.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने अयोग्य आहेत. 2) फक्त् ब विधान अयोग्य आहे.
3) फक्त अ विधान अयोग्य आहे. 4) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत.

27 **मौद्रिक जी.डी.पी व वास्तविक जी.डी.पी च्या भागाकाराला जी.डी.पी. --------- असे म्हणतात.**
1) उत्पन्न पद्धत 2) अवस्फितीक 3) उत्पादन पद्धत 4) खर्च पद्धत

28 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**
(अ) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत आार्थिक विकासाचा दर 5.6% इतका होता.
(ब) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचे प्रतिमान महालनोबिस प्रतिमानावर आधारित सुखमॉय चक्रवर्ती यांच्या प्रसिद्ध अशा 'The Mathematical Framework of the III Plan' या लेखावर आधारित होते.
(क) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी 1 एप्रिल 1969 ते 31 मार्च 1974 असा आहे.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत. 2) फक्त अ आणि क दोन्ही विधाने योग्य आहेत.
3) फक्त अ, ब आणि क विधाने अयोग्य आहेत. 4) फक्त अ, ब आणि क विधाने योग्य आहेत.

29 **महात्मा गांधीजीच्या --------- व्या जन्मदिनी 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' चे नाव महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे करण्यात आले आहे ?**
1) 125 व्या 2) 130 व्या 3) 140 व्या 4) 150 व्या

30 **सन 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्याची घनता चढत्या क्रमाने असलेल्या जिल्ह्यांच्या क्रम लावा.**
(अ) ठाणे (ब) रत्नागिरी (क) गडचिरोली (ड) चंद्रपूर
**पर्यायी उत्तरे**
1) चंद्रपूर, ठाणे, रत्नागिरी, गडचिरोली. 2) रत्नागिरी, चेंद्रपूर, गडचिरोली, ठाणे.
3) गडचिरोली, चंद्रपूर, रत्नागिरी, ठाणे. 4) ठाणे, रत्नागिरी, चंद्रपूर, गडचिरोली.

31 **प्रधान मंत्री जन-धन योजनेची योग्य वैशिष्टे कोणती आहेत ?**
(अ) कोणत्याही बँकेच्या शाखेत किंवा बिझिनेस करस्पॉन्डन्ट कडे खाते काढता येईल.
(ब) हे खाते 'मूलभूत बचत बँक ठेव खाते' प्रकारचे असेल त्यामध्ये किमान बॅलन्सची आवश्यकता असेल.
(क) या योजनेचया माध्यमातून प्रत्येक खातेदाराला रूपे डेबिट कार्ड दिले जाते.
**पर्यायी उत्तरे**
1) फक् अ वैशिष्टे योग्य आहे. 2) फक्त् अ आणि ब वैशिष्टे योग्य आहेत.
3) फक् ब वैशिष्टे योग्य आहे. 4) फक्त् अ आणि क वैशिष्टे योग्य आहेत.

32 **भारतात सध्या कोणत्या बाबीसाठी औद्योगिक परवाना आवश्यक आहे.**
(अ) मद्यार्क पेयांचे उत्पादन
(ब) सिगारेट व तंबाखूच्या इतर पर्यायांची निर्मिती.
(क) इलेक्ट्रिक, ऐरोस्पेस आणि सर्व प्रकारचे संरक्षण साधने.
(ड) औद्योगिक स्फोटके, आगपेट्यांसहित
(इ) घातक रसायने.
**पर्यायी उत्तरे**
1) अ, ब, आणि ड बाबींना परावाना आवश्यक आहे. 2) वरील सर्व बाबींना परवाना आवश्यक आहे.
3) अ, क, आणि इ बाबींना परावाना आवश्यक आहे. 4) ब, ड आणि इ बाबींना परावाना आवश्यक आहे.

33 **1 फ्रेब्रुवारी 1969 साली व्यापारी बॅकांवर 'सामाजिक नियंत्रण' लादण्याचा निर्णय खालीलपैकी कोणी घेतला होता ?**
1) सी. डी. देशमुख 2) श्री यशवंतरावजी चव्हाण 3) श्री जगजीवनराव 4) श्री मोरारजी देसाई.

34 **सरकारी व निमसरकारी रोख्यांच्या खरेदी - विक्रीच्या बाजाराला -------- असे म्हणतात.**
1) गिल्ट - एज्ड बाजार 2) औद्योगिक रोखेबाजार 3) नवरोखे बाजार 4) विद्यमान रोखे बाजार

35 **खाली विधानांचा विचार करून योगय विधान / ने ओळखा.**
(अ) सन 1955 मध्ये 'नाणे दुरूस्ती कायदा' संमत करण्यात आला होता.
(ब) भारतात 1 एप्रिल 1961 रोजी "दशमान चलन पद्धती" अस्तित्वात आली आहे.
(क) भारतात सिक्युरिटी पेपर मील, होशंगाबाद येथे आहे.
**पर्यायी उत्तरे**
1) विधाने अ आणि क दोन्ही योग्य आहेत. 2) विधान अ योग्य आहे.
3) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 4) विधान क योग्य आहे.

36 **सन 2020 - 21 मध्ये भारताचा अदृश्य खात्यावरील व्यवहार तोल तुटीनुसार किती आहे ?**

1) + 142.200 2) - 102.200 3) + 24.000 4) + 23.700

37 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) 26 सप्टेंबर 1949 या दिवशी पहिल्यांदा रूपयाचे अमेरिकन डॉलरच्या संदर्भात 30.5 टक्यांनी अवमुल्यन घडवून आणण्यात आले.

(ब) रुपयांचे पहिले अवमूल्यन सी.डी. देशमुख या तत्कालीन अर्थमंत्र्याच्या काळात केले होते.

(क) रूपयांचे दुसरे अवमूल्यन 6 जून 1966 रोजी अमेरिकन डॉलर व इतर हार्ड युरोपियन चलनांच्या संदर्भात 36.5 टक्यांनी घडवून आणत्यात आले होते.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त विधान अ योग्य आहे. 2) फक्त विधाने अ आणि ब योग्य आहेत.

3) फक्त विधान ब योग्य आहे. 4) फक्त विधाने अ आणि क योग्य आहेत.

38 **खालील विधाने विचारात घेऊन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) राष्ट्रीय लघु उद्योग विस्तार प्रशिक्षण संस्था, हैद्राबाद येथे आहे.

(ब) राष्ट्रीय उद्योजकता व लघु व्यवसाय विकास संस्था, मुंबई येथे याचे कार्यालय आहे.

(क) भारतीय उद्योजकता संस्था, याचे कार्यालय कोलकत्ता येथे आहे.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त विधान अ योग्य आहे. 2) फक्त विधान ब योग्य आहे.

3) फक्त विधान क योग्य आहे. 4) अ, ब आणि क विधाने योग्य आहेत.

39 **'रेल्वे विभाग आणि त्यांचे मुख्यालय' यांच्या योग्य जोड्या लावा.**

| | **रेल्वे विभाग** | **मुख्यालय** |
|---|---|---|
| (अ) | दक्षिण - मध्य विभाग | (1) गोरखपूर |
| (ब) | उत्तर - पश्चिम रेल्वे | (2) जबलपूर |
| (क) | पश्चिम - मध्य रेल्वे | (3) जयपूर |
| (ड) | उत्तर - पूर्व रेल्वे | (4) सिकंदराबाद |

**पर्यायी उत्तरे**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 3 | 2 | 1 | 4 |
| 2) | 2 | 3 | 4 | 1 |
| 3) | 1 | 2 | 3 | 4 |
| 4) | 4 | 3 | 2 | 1 |

40 **बंदर आधारित विकासाचया उद्दिष्टाने केंद्रिय कॅबिनेटने 25 मार्च 2015 रोजी कोणत्या घोषवाक्याने सागरमाला प्रकल्पाला मान्यता दिली आहे ?**

1) बंदर आधारित सुबत्ता 2) बंदर आधारित शाश्वत विकास

3) बंदर सोबत विकास हेच आमचे ध्येय 4) बंदर आधारित व्हिजन - 2025

41 **'माऊंट स्ट्युअर्ट एल्फिन्स्टन' यांच्या बाबत योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) माऊंट स्ट्युअर्ट एल्फिन्स्टन हे डंबार्टनशर स्कॉटलंड येथे एका उमराव घराण्यात जन्माला आले होते.

(ब) बाजीराव पेशव्यांच्या दरबारात ते यांचे सहाय्यक म्हणून भारतात आले होते.

(क) माऊंट स्ट्युअर्ट एल्फिन्स्टन यांनी गंगाधरशास्त्री पटवर्धनचा खुन त्र्यंबकजी डेंगळे यांनी केल्यामुळे त्यांची बाजू घेतली होती.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त अ आणि क विधाने योग्य आहेत. 2) फक्त अ , ब आणि क विधाने योग्य आहेत.

3) फक्त अ आणि ब विधाने योग्य आहेत. 4) फक्त अ , ब आणि क विधाने अयोग्य आहेत.

42 **सन 1907 च्या सुरत अधिवेशनाबाबत कोणती विधाने खरी आहेत.**

(अ) इ. स. 1907 मधील सुरत अधिवेशनासाठी लाला लजपतराय यांना अध्यक्षपद देण्याची लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांची सुचना मान्य केली नाही.

(ब) सन 1907 च्या सुरत अधिवेशनात 'जहाल गटाला' असे वाटत होते की, मवाळ गटाने राष्ट्रीय कॉंग्रेसमधून बाहेर पडावे

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त ब विधान योग्य आहे.
2) फक्त अ आणि ब विधाने योग्य आहेत.
3) फक्त अ आणि ब विधाने अयोग्य आहेत.
4) फक्त अ विधान योग्य आहे.

43 **3 फेब्रुवारी 1928 रोजी सायमन कमिशनच्या विरोधात 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिक पार्टी' तर्फे -------- या ठिकाणी लाला लजपतराय यांनी निषेध मोर्चा काढला होता.**

1) अमृतसर 2) दिल्ली 3) लाहोर 4) ढाका

44 **-------- या दिवशी 'महत्मा गांधीजी' यांनी उमर सोभानीच्या मालकीच्या एल्फिन्स्टन मिलच्या पटांगणात परदेशी कपड्याची पहिली होळी केली होती.**

1) 31 जुलै 1921 2) 1 फेब्रुवारी 1922 3) 17 नोंव्हेंबर 1921 4) 12 फेब्रुवारी 1922

45 **'सत्यशोधक समाज' या संस्थेबाबत योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) राजर्षी शाहू महाराजांनी 11 जानेवारी 1911 रोजी कोल्हापूरात 'बाबूराम कदम' यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

(ब) कोल्हापूर संस्थानातील 'सत्यशोधक समाज' या संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून 'अण्णासाहेब लट्टे' हे काम पाहत होते.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त अ आणि ब विधाने योग्य आहेत.
2) फक्त अ विधान योग्य आहे.
3) फक्त ब विधान योग्य आहे.
4) फक्त अ आणि ब विधाने अयोग्य आहेत.

46 **शिक्षण विषयक खालील अहवाल, आयोग त्यांच्या निर्मिती वर्षानुसार क्रमाने लावा.**

(अ) हार्टोग समिती (ब) सार्जंट (क) सॅडलर आयोग

**पर्यायी उत्तरे**

1) अ, ब, क 2) ब, क, अ 3) क, अ, ब 4) ब, अ, क

47 **अमेरिकेतील सिएटल येथील 'युनायटेड इंडिया हाऊस' ची स्थापना करण्यात कोणाचा पुढाकार होता ?**

(अ) लाला हरद्याळ (ब) जी. डी. कुमार (क) तारकानाथ दास (ड) राम बिहारी बोस

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त अ आणि ड यांचा समावेश होता.
2) फक्त ब आणि क यांचा समावेश होता.
3) फक्त क आणि ड यांचा समावेश होता.
4) फक्त अ आणि ब यांचा समावेश होता.

48 **29 ते 31 मे 1941 रोजी 'महाराष्ट्र परिषदेचे' तिसरे अधिवेशन नांदेड जिल्ह्यातील कोणत्या तालुक्यात पार पडले आहे ?**

1) भोकर 2) किनवट 3) लोहा 4) हादगांव

49 **संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत 18 जानेवारी 1956 रोजी कोल्हापूरातील बिंदू चौकात केलेल्या गोळीबारात ---------- हे हुतात्मा झाले होते.**

1) कृष्णा देसाई 2) रसिक भट 3) लालजी पेंडसे 4) शंकरराव तोरसकर

50 **'शिवराम हरी राजगुरू ' हे क्रांतीकारक खालीलपैकी कोणत्या विषयात पारंगत होते ?**

1) गणित आणि तर्कशास्त्र 2) संस्कृत आणि नितीशास्त्र 3) तर्कशास्त्र आणि संस्कृत 4) नितीशास्त्र आणि गणित

51 **'गणेश वसुदेव जोशी' यांनी स्थापन केलेल्या 'पूना सार्वजनिक सभेची' शाखा खालीलपैकी कोणत्या ठिकाणी नव्हती ?**

1) वाई 2) बार्शी 3) धारवाड 4) नेवासे

52 **खालील विधानांचा विचार करुन अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) 'असे महानपुरुष मरत नसतात, त्याच्या कार्याच्या रूपाने ते अमर झालेले असतात' असे उद्गार राजर्षी शाहू महाराजांनी लोकमान्य टिळकांबद्दल प्रकट केले होते.

(ब) 'कोणत्याही फळाची अपेक्षा न करता अंगीकृत कार्य अखेरपर्यंत चालविले म्हणून वि. रा. शिंदेंचा उपेक्षित राहीलेले निष्काम कर्मयोगी असा गौरव महात्मा गांधींनी केला होता'.

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ विधान (अ) अयोग्य आहे.
2) केवळ विधान (अ) अयोग्य आहे.
3) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.
4) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत.

53 **बुद्धीवाद, व्यक्तीवाद, समता आणि मानवतावाद हा समाजप्रबोधनाचा चतु:सूत्री कार्यक्रम कोणत्या समाजसुधारकाने सांगितला ?**
1) गोपाळ हरी देशमुख 2) लोकमान्य टिळक 3) ताराबाई शिंदे 4) गो. ग. आगरकर

54 **महर्षी धोंडो केशव कर्वे यांना त्यांच्या अनाथ आश्रमातील मुले / विद्यार्थी आदराने काय म्हणत असे ?**
1) सर 2) आण्णा 3) दादा 4) तात्या

55 **तेरदळ शेतकरी परिषद कोणत्या समाजसुधारकाने शेतकरी बांधवांसाठी भरवली होती ?**
1) राजर्षी शाहू महाराज 2) महात्मा फुले 3) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे 4) महात्मा गांधी

56 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**
(अ) रक्तातील रंग नसलेला किंवा फिकट पिवळसर अल्कली माध्यम असलेला द्रव म्हणजे रक्तद्रव होय.
(ब) रक्ताच्या एकूण 65% भाग म्हणजे रक्तद्रव आहे.
(क) रक्तद्रवात 10% असेंद्रिय घटक यांचा समावेश होतो.
**पर्यायी उत्तरे**
1) अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहे. 2) फक्त अ विधान योग्य आहे.
3) फक्त क विधान योग्य आहे. 4) ब आणि क दोन्ही विधाने योग्य आहे.

57 **अलैंगिक प्रजनन (Asexual Reproduceltion) यांची वैशिष्टे सांगा.**
(अ) नवजात पेशी तंतोतंत मुळ पेशीसारखी असते.
(ब) यात जननिक विचरणाचा अभाव असतो.
(क) अलैंगिक प्रजनन हे लैंगिक प्रजननापेक्षा संथ गतिने घडून येते
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ विधान योग्य आहे.
2) फक्त ब आणि क विधाने योग्य आहेत.
3) फक्त क आणि अ विधाने योग्य आहेत.
4) फक्त अ आणि ब विधाने योग्य आहेत.

58 **सेल्युलोजने बनलेली प्रद्रव्यपटलाच्या बाहेरील बाजूस एक भक्कम आवरण असते त्यास --------- म्हणतात.**
1) पेशीपटल 2) पेशीद्रव्ये 3) पेशीअंगके 4) पेशीभित्तिका

59 **'बायोफायटा' वर्गीय वनस्पती बाबत काय खरे आहे ?**
(अ) ब्रायोफायटा वर्गीय वनस्पती यांचे शरिर चपटे, मऊ व रेबीनसारखे असते.
(ब) ब्रायोफायटा वर्गीय वनस्पती या बहुतेक 'जलचर' असून त्यांच्यात फलन होण्यासाठी बाह्यपाण्याची आवश्यकता नसते.
(क) ब्रायोफायटा वर्गीय वनस्पती यांची वाढ ओलसर वातावरणात घेऊन प्रजनन अशाकीय पद्धतीने होते.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त क विधान योग्य आहे. 2) फक्त अ विधान योग्य आहे. 3) फक्त ब विधान योग्य आहे. 4) वरील सर्व

60 **खालील विधाने विचारात घेऊन अयोग्य विधान / ने ओळखा.**
(अ) मानवी कवटीमध्ये एकूण 48 हाडे आहेत.
(ब) मानवी शरीरातील प्रत्येक कामात 6 हाडे असतात.
(क) मानवी शरीरातील सर्वात मोठे हाड हे पाठीच्या कण्यातील अभने.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त क विधान अयोग्य आहे. 2) फक्त ब विधान अयोग्य आहे.
3) वरील तिन्ही विधाने अयोग्य आहेत. 4) फक्त अ विधान अयोग्य आहे.

61 **इ. स. .......... मध्ये रूदफोर्डने सुवर्णपनीच्या प्रयोगाद्वारे थॉमसनचा अणूसिद्धांत खोडून काढला आहे ?**
1) इ. स. 1909 2) इ. स. 1900 3) इ. स. 1905 4) इ. स. 1911

62 **............. पध्दतीमध्ये लोखंड किंवा स्टीलचे क्षरण रोखण्यासाठी त्यावर जस्ताचा पातळ थर दिला जातो.**
1) कथिलीकरण 2) गॅल्व्हनायझिंग 3) विद्युत विलेपन 4) धनाग्रीकरण

63 **'सोडियम बायकार्बोनेट' याबाबत अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) सोडियम बायकार्बोनेटला 'सोडियम हायड्रोजन कार्बोनेट' असे सुद्धा म्हणतात.

(ब) सोडियम बायकार्बोनेटला बेंकिंग सोडा / खाण्याचा सोडा असे म्हणत असून तो फिकट गुलाबी रंगाचा स्फटिकमय पदार्थ आहे

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त ब विधान अयोग्य आहे. 2) फक्त अ आणि ब विधाने योग्य आहेत.

3) फक्त अ आणि ब विधाने अयोग्य आहेत. 4) फक्त अ विधान अयोग्य आहे.

64 **बीटा किरण हे -------- कण असतात.**

1) व्हनप्रभारित 2) शुन्यप्रभारित 3) ऋणप्रभारित 4) प्रभाररहित

65 **गारव्यासाठी रेफ्रीजरंट म्हणून काय वापरतात ?**

1) अनोमिया 2) सोडियम 3) क्लोरिन 4) फ्रेऑन

66 **एक विमान धावपट्टीवरून 3/ms$^2$ त्वरणाने धावत शेवटी 30 सेकंदात उड्डाण घेते तर ते विमान एकूण धावपट्टीवर किती मीटर धावले असेल?**

1) 5013 2) 1350 3) 13.50 4) 1.350

67 **ध्वनी हे अनुतरंगाचे उदाहरण आहे तर प्रकाश हे अवतरंगाचे उदाहरण आहे या विधानाबाबत ------------**

1) हे विधान संपूर्णत: बरोबर आहे. 2) हे विधान संपूर्णत: चूक आहे.

3) हे विधान अशत: बरोबर आहे. 4) हे विधान अशत: चूक आहे.

68 **दृष्टी दोषाची योग्य कारणे कोणती आहेत ?**

(अ) बुबुळ लांबट होण. (ब) भिंग एकरेषीय होणे. (क) डोळयांचे भिंग व दृष्टीपटल यातील अंतर वाढणे.

(ड) डोळयातील भिंगापशीय स्थायू पुरेसे शिथिल होणे. (इ) भिंगाची अभिसारी शक्ती न वाढणे.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त अ आणि इ योग्य कारणे आहेत. 2) फक्त ब, क आणि ड योग्य कारणे आहेत.

3) फक्त ब आणि इ योग्य कारणे आहेत. 4) फक्त अ आणि क योग्य कारणे आहेत.

69 **"वाहकाची भौतिक स्थिती कायम असताना वाहकातून वाहणारी विद्युत धारा ही त्या वाहकाच्या दोन टोकांमधील विभवांतराशी समानुपाती असते." हा नियम कोणत्या नावाने ओळखला जातो.**

1) ओहमचा नियम 2) न्युटनचा चौथा नियम 3) फेड्रलचा नियम 4) डोबोनायरल आष्टक नियम

70 **'विद्युत जनित्र' याबाबत योग्य 'विधान / ने ओळखा.**

(अ) जे उपकरण यांत्रिक ऊर्जेचे विद्युत ऊर्जेत रूपांतर करते त्याला विद्युत जनित्र असे म्हणतात.

(ब) विद्युत जनित्र हे विद्युत चुंबकीय क्षेत्र निर्माण करतात.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त अ विधान योग्य आहे. 2) विधाने अ आणि ब दोन्हीही अयोग्य आहेत.

3) विधाने अ आणि ब दोन्हीही योग्य आहेत. 4) फक्त ब विधान योग्य आहे.

71 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) 'विजयदुर्ग' हा जलदुर्ग किल्ला रत्नागिरी जिल्ह्यामध्ये आहे. (ब) पालघर जिल्ह्यात 'अर्नाळा' येथे जलदुर्ग किल्ला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ विधान (ब) योग्य आहे. 2) केवळ विधान (अ) योग्य आहे.

3) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत. 4) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.

72 **खालील विधानांचा विचार करुन अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) नांदेड जिल्ह्यातील मुदखेडचे डोंगर हे सातमाळा - अजिंठा डोंगररांगेचा भाग नाही.

(ब) नाशिक, नंदूरबार व धुळे जिल्ह्यातील 'गाळणा टेकड्या' या सातमाळा - अजिंठा डोंगररांगेचा भाग आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत. 2) केवळ विधान (ब) अयोग्य आहे.

3) केवळ विधान (अ) अयोग्य आहे. 4) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत.

73 **गोदावरी नदीची भारतातील एकूण लांबी किती आहे ?**

1) 1,467 कि. मी 2) 1,465 कि. मी 3) 1,638 कि. मी 4) 1,293 कि. मी

74 **कोकणातील खाड्यांचा उत्तरेकडून दक्षिणेकडे क्रम लावा.**

1) कासा, घारापुरी, साष्ठी, वसई, दातिवरे
2) दातिवरे, वसई, कासा, घारापुरी, साष्ठी
3) कासा, दातिवरे, वसई, साष्ठी, घारापुरी
4) दातिवरे, वसई, साष्ठी, घारापुरी, कासा

75 **सन 2017 - 18 अंतिम अहवालानुसार महाराष्ट्र राज्यात नारळ या पिकासाठी किती हेक्टर जमिन लागवडीखाली आहे, असा अंदाज वर्तविला जातो ?**

1) 26,965 हेक्टर
2) 25,729 हेक्टर
3) 27,930 हेक्टर
4) 24,900 हेक्टर

76 **महाराष्ट्रातील 'मेट्रो रेल्वे' याबाबत सत्य विधान / ने ओळखा.**

(अ) पुणे मेट्रोचे भुमिपुजन 24 डिसेंबर 2016 साली झाले असून या प्रकल्पात एकूण 33.28 किमी लांबीचा रेल्वे प्रकल्प आहे.
(ब) महाराष्ट्रात नवी मुंबई आणि नाशिक येथे 'निओ मेट्रो प्रकल्प' प्रस्तावित आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत.
2) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.
3) फक्त विधान (अ) योग्य आहे.
4) फक्त विधान (ब) योग्य आहे.

77 **अयोग्य जोडी ओळखा.**

| | **अभयारण्य** | **जिल्हा** |
|---|---|---|
| 1) | कारंजा - सोहोळ | अकोला |
| 2) | तुंगारेश्वर | रायगड |
| 3) | मायनी | सातारा |
| 4) | अंधारी | चंद्रपुर |

78 **सन 2011 च्या जनगणेनुसार 'ग्रामीण पुरुष साक्षरता' प्रमाण किती टक्के आहे ?**

1) 77.01 टक्के
2) 88.69 टक्के
3) 85.15 टक्के
4) 92.12 टक्के

79 **'महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाचा' पवन विद्युत निर्मिती करणारा राज्यातील सर्वात मोठा प्रकल्प कोठे आहे ?**

1) मिरज
2) खेड
3) देवगड
4) वनकुसडे

80 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) महाराष्ट्र राज्याची उत्तर दक्षिण लांबी 720 कि.मी असुन पूर्व पश्चिम लांबी पेक्षा कमी नाही.
(ब) महाराष्ट्र राज्यांचे भारताच्या एकूण क्षेत्रफळा पैकी 9.36 % प्रदेश व्यापलेला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधान (अ) व (ब) दोन्ही योग्य आहेत.
2) विधान (अ) व (ब) दोन्ही अयोग्आहेत.
3) फक्त विधान (ब) योग्य आहे.
4) फक्त विधान (अ) योग्य आहे.

81 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) ठोसेघर धबधबा हा सातारा जिल्ह्यात असुन या धबधब्याची उंची 380 मी. आहे.
(ब) कुने धबधबा या पुणे जिल्ह्यात असुन या धबधब्याची उंची 217 मी. आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.
2) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत.
3) फक्त (अ) विधाने योग्य आहे4) फक्त
(ब) विधाने योग्य आहे.

82 **'किनाऱ्याची काळी' मृदा या बाबत सत्य विधान ओळखा.**

(अ) महाराष्ट्र राज्यात कोकण किनारपट्टी लगत सखल प्रदेशात जी गाळाची मृदा आढळते तिला 'भाबर मृदा' असे म्हणतात.
(ब) कोकण किनारपट्टी लगतची मृदा ही वाळू मिश्रीत लोम प्रकारची असुन या मृदेत तांदळाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ) विधाने योग्य आहे.
2) फक्त (ब) विधाने योग्य आहे.
3) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत.
4) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.

83 **अयोग्य जोडी ओळखा.**

| | **उद्यान** | **ठिकाण** |
|---|---|---|
| 1) | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | बोरवली |
| 2) | नवेगाव राष्ट्रीय उद्यान | गोंदिया |
| 3) | ताडोबा राष्ट्रीय उद्यान | चंद्रपूर |
| 4) | गुगामल राष्ट्रीय उद्यान | गडचिरोली |

84 **खालील विधानांचा विचार करुन अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) दुर्गापूर हे औष्णीक विद्युत केंद्र नागपूर जिल्ह्यात असुन विद्युत क्षमता मेगावॅट मध्ये 1.840 इतकी आहे.

(ब) अकोला जिल्ह्यात पारस औष्णिक विद्युतकेंद्र असुन विद्युत क्षमता मेगावॅट मध्ये 482.5 इतकी आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधान (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत. 2) विधान (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत.
3) फक्त विधान (अ) अयोग्य आहे. 4) फक्त विधान (ब) अयोग्य आहे.

85 **सन 2001 ते सन 2011 या दशकात महाराष्ट्रात लोकसंख्या वाढीचा दर किती टक्के होता ?**

1) 17.74 % 2) 15.99 % 3) 22.73 % 4) 6.74 %

86 **P हा Q च्या आग्नेय दिशेला 60m आहे. R हा Q च्या ईशान्य दिशेला 60m आहे. तर R हा P च्या कोणत्या दिशेला आहे ?**

1) उत्तर 2) ईशान्य 3) दक्षिण 4) आग्नेय

87 **काही मुले घड्याळ आहेत, दिलीप हा मुलगा आहे. या दोन विधानांच्या आधारे खालीलपैकी कोणते अनुमान काढाल ?**

1) सर्व मुले घड्याळ आहेत. 2) दिलीप घड्याळ आहे. 3) काही मुले घड्याळ नाही. 4) दिलीप घड्याळ नाही.

88 **सचिनचे घड्याळ प्रत्येक तासाला 4 सेकंद पुढे जाते. सोमवारी सकाळी 11:00 वाजता बरोबर लावलेले ते घड्याळ त्यानंतर येणाऱ्या शनिवारी सकाळी 11:00 वाजता कोणती वेळ दाखवेल ?**

1) 11 : 08 2) 11 : 02 3) 11 : 30 4) 11 : 48

89 **पर्यायातील कोणत्या चिन्हांच्या व संख्यांच्या अदलाबदलीमुळे खालील समीकरण संतुलित होईल ?**

$8 \times 6 + 2 = 22$

1) +, ×, 2 आणि 6 2) +, ×, 2 आणि 8 3) +, ×, 6 आणि 8 4) +, ×, 2 आणि 22


90 **जर A - B चा अर्थ आहे, A, B ची मुलीगी आहे. A + B चा अर्थ आहे, A, B ची पत्नी आहे. A - B चा अर्थ आहे, A, B चे वडील आहेत. A × B चा अर्थ आहे, A, B चा पुत्र आहे. तर 'P × R - S' या संबंधात P चा S शी काय संबंध आहे ?**

1) वडील 2) आजोबा 3) नातू 4) बहिण

91 **पाच अक्षर समूह दिलेले आहेत. त्यापैकी एक, विशिष्ट प्रकारे इतरांहून वेगळा आहे. तो वेगळा अक्षरसमूह शोधा.**

1) LSNVE 2) BOQUR 3) HNLIV 4) FWGHZ

92 **प्रश्नार्थ चिन्हाच्या जागी येणारी योग्य संख्या शोधा -**




1) 256 2) 255 3) 324 4) 289


93 **A व B यांच्या वयाचे गुणोत्तर 3 : 5 असून, त्यांच्या वयांतील फरक 10 वर्षे आहे. तर A चे आजचे वय आकढा.**

1) 20 वर्षे 2) 15 वर्षे 3) 30 वर्षे 4) 18 वर्षे

94 **बुद्धिबळ खेळाच्या स्पर्धेत काही खेळांडूनी भागा घेतला होता, त्या स्पर्धेत प्रत्येक खेळाडून इतर खेळांडूशी एकदा खेळला तेव्हा एकूण सामाने 28 झाल्यास किती खेळांडूही त्या स्पर्धेत भाग घेतला होता ?**

1) 8 2) 9 3) 14 4) 17

95 खालील अकृत्यांमध्ये एकाच घनाच्या तीन अवस्था दिल्या आहेत. या आकृत्यांचा अभ्यास करून A अक्षराच्या विरूद्ध बाजूला कोणते अक्षर असेल, ते सांगा.




1) H 2) P 3) B 4) M

96 एक रेल्वेगाडी 480 मीटर लांबीच्या बोगदा 81 सेकंदात ओलांडते व 180 मीटर लांबीच्या पुलास 54 सेकंदात ओलांडते, तर त्या रेल्वेची लांबी किती ?

1) 510 मीटर 2) 380 मीटर 3) 470 मीटर 4) 420 मीटर

97 12 पंख्यांची विक्री किंमत ही 15 पंख्यांच्या खरेदी किमती इतकी आहे, तर अशा व्यवहारात शेकडा नफा वा तोटा किती ?

1) 25% तोटा 2) 25% नफा 3) 30% तोटा 4) 30% नफा


98 एका माणसाने एक रक्कम 6% दराने व दुसरी रक्कम 7% दराने लावली. 2 वर्षानंतर एकूण 354 रू. व्याज मिळाले. जर पहिल्या रकमेच्या 1/4 हे दुसऱ्या रकमेच्या 1/5 असेल, तर एकूण रक्कम किती ?

1) 2.700 रू 2) 2900 रू 3) 2700 रू. 4) 3000 रू.

99 एका शंकूची त्रिज्या 7 से.मी. असून उंची 42 से.मी. आहे, तर या शंकूचे घनफळ किती ? तसेच धारकता किती ?

1) 63.36 lit 2) 636.6 lit 3) 42.36 lit 4) 6.336 lit

100 पुढील आकृतीत, त्रिज्या 2.5 cm से.मी. असून $\angle LOY = 120°$ आहे, तर वर्तुळपाकळी X-XMY चे क्षेत्रफळ काढा




1) 6.54 $cm^2$ 2) 65.4 $cm^2$ 3) 60.4 $cm^2$ 4) 64.64 $cm^2$

**ALL THE BEST**

## सूचना माहितीस्तव - (पृष्ठ 1 वरून पुढे ........)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यक्तिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे. असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम - 82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/ किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ सपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग - 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न (माहितीस्तव)

प्र. क्र. 101. **'गुलामगिरी' हे पुस्तक कोणी लिहले आहे ?**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर 2) गो.ग. आगरकर

3) महात्मा फुले 4) राजा राममोहन रॉय

ह्या प्रश्नाचे उत्तर "(3) महात्मा फुले " असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 101. ① ② ● ④

अशा पध्दतीने प्रस्तुत प्रश्नपुसस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर - क्रमांक तुम्हाला स्वतंत्र्यरीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्यात त्या प्रश्नपक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

## कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK.

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

अधिकारी घडविणारी विश्वसनीय संस्था

# स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

**UPSC/MPSC/BANKING/SSC**

**Director : Dr. Vilas S. Gajghate 9923262977**

2023

**Code : YO2**

## संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क)

सामान्य क्षमता चाचणी

वेळ : 1 (एक) तास

Paper No. 02

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

### सराव पेपर क्र. 02

| Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | 2 | **26** | 3 | **51** | 4 | **76** | 1 |
| **2** | 2 | **27** | 2 | **52** | 3 | **77** | 2 |
| **3** | 3 | **28** | 1 | **53** | 4 | **78** | 3 |
| **4** | 4 | **29** | 3 | **54** | 2 | **79** | 4 |
| **5** | 1 | **30** | 3 | **55** | 3 | **80** | 3 |
| **6** | 3 | **31** | 4 | **56** | 2 | **81** | 2 |
| **7** | 4 | **32** | 2 | **57** | 4 | **82** | 3 |
| **8** | 2 | **33** | 4 | **58** | 4 | **83** | 4 |
| **9** | 2 | **34** | 1 | **59** | 2 | **84** | 1 |
| **10** | 4 | **35** | 3 | **60** | 3 | **85** | 2 |
| **11** | 1 | **36** | 1 | **61** | 4 | **86** | 1 |
| **12** | 1 | **37** | 4 | **62** | 2 | **87** | 3 |
| **13** | 3 | **38** | 1 | **63** | 1 | **88** | 4 |
| **14** | 2 | **39** | 4 | **64** | 3 | **89** | 3 |
| **15** | 3 | **40** | 1 | **65** | 4 | **90** | 3 |
| **16** | 3 | **41** | 3 | **66** | 2 | **91** | 4 |
| **17** | 4 | **42** | 4 | **67** | 1 | **92** | 3 |
| **18** | 1 | **43** | 3 | **68** | 4 | **93** | 2 |
| **19** | 4 | **44** | 1 | **69** | 1 | **94** | 1 |
| **20** | 4 | **45** | 3 | **70** | 3 | **95** | 1 |
| **21** | 1 | **46** | 3 | **71** | 1 | **96** | 4 |
| **22** | 3 | **47** | 2 | **72** | 3 | **97** | 2 |
| **23** | 1 | **48** | 1 | **73** | 2 | **98** | 3 |
| **24** | 4 | **49** | 4 | **74** | 4 | **99** | 4 |
| **25** | 3 | **50** | 3 | **75** | 1 | **100** | 1 |

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर